संं.फौ.ख.क्र.४०/२०२५
सरकार –वि– उमाजी
नि.क्र. ११ पुढे

MHCH100000512025

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०२ मे, २०२६)

१. आरोपी उमाजी देविदास गेडाम याचेविरुध्द मुंबई दारूबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अंतर्गत प्रस्तुत मामला दाखल करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत खटल्याच्या निर्णयाकरीता पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयांबाबतचे निष्कर्ष मी सकारण खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दि. ०९/०७/२०२४ रोजी ०९.३५ ते १०.३५ वाजताच्या दरम्यान दाबगाव मक्ता, ता. मुल, जि. चंद्रपूर येथे आरोपी हा एका कापडी पिशवीत ६५ नग रॉकेट संत्रा ब्रॅन्डच्या देशी दारूने भरलेल्या शिश्या प्रत्येकी ९० मि.ली. अवैधरीत्या विक्रीकरीता बाळगताना मिळून आला व अशाप्रकारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली काय? | **नाही** |
| २) | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ व २ बाबत –**

३. आरोपीविरूध्द उपरोक्त आरोप सिध्द करण्याकरीता सरकार पक्षातर्फे दोन स रत धनरात भडके व अमोल शंकर कातकर जे की प्रस्तुत खटल्यात मौका जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदार आहे, यांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यात आली. परंतु, सरकार पक्षाचा सदर

साक्षीदाराचा साक्षीवरून ते तथाकथीत घटनेबाबत सरकार पक्षास सहाय्य करीत असल्याचे आढळुन येत नाही. साक्षीदार क्र. १ व २ यांचा मौखिक पुरावा असे दर्शवितो की, दिनांक ०९/०७/२०२४ रोजी त्यांना राज्य उत्पादन शुल्कचे अधिकारी यांनी पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते व त्यांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नव्हती. राज्य उत्पादन शुल्क च्या अधिकाऱ्यानी कुठेही बोलाविले नव्हते. अभियोग पक्षाचा साक्षीदार हे मोका जप्ती पंचनाम्यावरील त्यांच्या स्वतःची सही मान्य करतो, परंतू त्यातील मजकुराविषयी अनभिज्ञता दर्शवितो. परिणामतः सरकारी वकील साहेबांनी साक्षीदारास सरकार पक्षास सहाय्य करत नसल्याने फितूर घोषीत करून सखोल उलटतपास घेतला. परंतु, तथाकथीत घटनेच्या वेळी व ठिकाणी प्रस्तुत आरोपी अवैधरीत्या दारू विक्रीकरीता बाळगताना मिळून आला याबाबत सा.क्र. १ व २ च्या साक्षीत आलेला नाही. परिणामी, साक्षीदार क्र.१ व २ यांची साक्ष अभियोग पक्षास सहाय्यक ठरत नाही.

४. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्रं. १ सुरज धनराज भडके व साक्षीदार क्र. २ अमोल शंकर कातकर यांचे साक्षीवरून मौका व जप्तीपंचनामा सिद्ध होत नाही. आरोपीविरूद्ध गुन्ह्यातील घटनास्थळ व जप्ती न सिद्ध झाल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ अन्वये बयाण नोंदविले नाही.

// //

**आदेश**

१. आरोपी उमाजी देविदास गेडाम याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करण्यात येते.

सं.फौ.ख.क्र.४०/२०२५
सरकार –वि– उमाजी
नि.क्र. ११ पुढे

३. आपील कालावधी नंतर जप्त मुददेमाल म्हणजेच ६५ नग रॉकेट संत्रा ब्रॅन्डच्या देशी दारूने भरलेल्या शिश्या प्रत्येकी ९० मि.ली. राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडे कायदेशीर विल्हेवाट लावण्याकरिता पाठविण्यात याव्या.

४. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) अन्वये आरोपीने वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्याची हमी देण्याकरिता रुपये १५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढ्या रकमेचे जामीन द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

SARWARI QADIR AHEMAD NAIMODDIN
Digitally signed by SARWARI QADIR AHEMAD NAIMODDIN
Date: 2026.05.02 18:03:16 +0530

(क्यु.ए.एन.सरवरी)
दिनांकः०२/०५/२०२६
न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी),
मुल, जि.चंद्रपूर

सं.फौ.ख.क्र.४०/२०२५

सरकार –वि– उमाजी

नि.क्र. ११ पुढे

**Certificate**

Certified that PDF copy of order supra is word to word identical to the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Ankit V. Gupta |
| Dictated on | : | 02/05/2026 |
| Checked on | : | 02/05/2026 |
| Signed on | : | 02/05/2026 |
| Uploaded on | : | 02/05/2026 |